# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र.५८/२०२२**

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठ परिसरातील सर्व पदवी/पदव्युत्तर विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१–२२ साठी वसतिगृह जागांचे वाटप करण्यात आलेले आहे. वसतिगृह वितरित झालेल्या विद्यार्थ्यांची यादी शुक्रवार दिनांक २५/०२/२०२२ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल तसेच वसतिगृह प्रवेशाची लिंक विद्यार्थ्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांक तसेच नोंदणीकृत ई–मेल वर उपलब्ध करून देण्यात येईल.

वसतिगृह प्रवेश निश्चित करण्यासाठी दिलेल्या लिंकवर क्लिक करून विद्यार्थ्यास वसतिगृह शुल्क भरता येईल. सदरील लिंक उपलब्ध करून दिलेल्या दिनांकापासून ५ दिवसासाठी उपलब्ध राहील. प्रवेश यादीतील विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीमध्ये प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली नाही तर सदरील रिक्त जागा उर्वरित अर्जदार विद्यार्थ्यांच्या यादीमधून भरण्यात येतील. प्रवेश यादीतील विद्यार्थ्यांनी वसतिगृह नियम व सूचनांचे पालन करून सदर कालावधीत प्रवेश निश्चित करणे बंधनकारक राहील. वसतिगृह शुल्क भरल्यानंतर ऑनलाईन प्रणालीद्वारे वसतिगृह क्रमांक व खोली क्रमांक दिला जाईल. वसतिगृह शुल्क भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत तसेच सोबत जोडलेले प्रमाणपत्र विभागप्रमुखांच्या सही शिक्क्यासह मुलांच्या/मुलींच्या वसतिगृह कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील.

विद्यापीठ परिसरातील वसतिगृहे पहिल्या टप्प्यात ५०% क्षमतेने सुरू करण्यात येत आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

कुलसचिव<br>
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ<br>
पुणे–०७

**गणेशखिंड, पुणे – ४११ ००७**<br>
**सा.फु.पु.वि/वसतिगृह/२०२१–२२/९०८**<br>
दिनांक :– २४/०२/२०२२

**प्रत माहितीसाठी सादर :–**

**मा. विभागप्रमुख :– आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावे, ही विनंती.**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की ..........................................................................हा/ही विद्यार्थी/विद्यार्थीनी..........................या पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रथम/द्वितीय/तृतिय वर्षात शिकत असून त्याने/तिने प्रस्तुत विभागात चालू सत्रात प्रवेश घेतलेला आहे. सदर विद्यार्थ्यास या विभागासाठी उपलब्ध असणा-या जागांमधून विहित प्रक्रियेनुसार वसतिगृहात प्रवेश देण्यास शिफारस करण्यात येत आहे.

**विभागप्रमुख**